३

मंगळवार, ३१ मे २०२२

सकाळ ॲग्रोवन

# पणन मंडळात 'जीआय' मानांकनसाठी विशेष कक्ष

## शेतकऱ्यांना रास्त दरात मिळणार नोंदणी ते निर्यातीची सेवा

**गणेश कोरे : ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : राज्यातील कृषी हवामान आधारित विविध फळे, भाजीपाला पिकांचे वैशिष्ट्यपूर्ण चव, गंध, रंगामुळे प्रसिद्ध आहेत. या उत्पादनांना भौगोलिक मानांकनाद्वारे (जीआय) जागतिक बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी राज्य कृषी पणन मंडळामध्ये पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या सूचनेनुसार विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाद्वारे शेतकरी, शेतकरी गट, उत्पादक कंपन्यांना जीआय नोंदणी ते निर्यातीची सेवा रास्त दरात उपलब्ध होणार आहे.

या बाबतची माहिती राज्य कृषी मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी ॲग्रोवनला दिली.

पवार म्हणाले, "महाराष्ट्रातून शेतमालाची निर्यात वाढत आहे. जागतिक पातळीवर भारतातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील फळे, भाजीपाला या उत्पादनांना मागणी वाढत आहे. राज्यातील कृषी हवामान विभागांमुळे प्रत्येक भागातील विविध वैविध्यपूर्ण उत्पादने आहेत. या उत्पादनांची चव, गंध, रंग आदींची गुणवैशिष्ट्ये आहेत. या उत्पादनांना भौगोलिक निर्देशांकाची मागणी आता जगभरातून होत आहे. यामुळे पणन मंडळामध्ये जीआय मानांकन नोंदणी ते निर्यात या विविध टप्प्यांवर शेतकऱ्यांना, गट आणि उत्पादक कंपन्यांना सेवा मिळावी, अशी सूचना पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी केली होती. यानुसार प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाला पणन मंडळाच्या संचालक मंडळाने नुकतीच मान्यता दिली आहे."

### विपणनासाठी ३ लाख

जीआय उत्पादनांच्या प्रभावी ब्रॅण्डींग, विपणन, प्रशिक्षणासाठी राज्य कृषी पणन मंडळाद्वारे यापूर्वीच योजना राबविण्यात येत आहे. या योजनेद्वारे नोंदणीकृत जीआय उत्पादनांच्या लोगो, ब्रॅण्डींग, पॅकिंग, क्यूआर कोड आदी विविध तंत्रज्ञान अंमलबजावणीसाठी प्रत्येक गटाला तीन लाखांचे अनुदान दिले जात आहे, असेही पवार यांनी सांगितले.

### शासनाची, शेतकऱ्यांची लूट थांबणार

जीआय नोंदणीसाठी काही खासगी व्यावसायिकांकडून अवाजवी रकमेची मागणी केली जाते. ही रक्कम २५ लाखांपर्यंत आहे. ही रक्कम जास्त असल्याने शेतकरी गट, उत्पादक कंपन्या एवढी रक्कम देऊ शकत नाही. यामुळे शेतकरी शासनाकडे पैशांची मागणी करतात. शासनाने यापूर्वी काही खासगी संस्थांना विविध योजनेतून मोठ्या प्रमाणावर पैसे देऊन जीआय नोंदणी करण्यात आली. मात्र ही उत्पादने केवळ नोंदणीपुरतीच राहिली. यांचे पुढे प्रभावी विपणन झाले नसल्याचे वास्तव आहे. यामुळे पणनद्वारे जीआय नोंदणी, विपणन, निर्यातीची सेवा रास्त दरात उपलब्ध होणार आहे.

### क्लिष्टता कमी करण्यात येणार

बौद्धिक संपदा हक्क कायदा (इंन्टेलेक्चूअल प्रॉपर्टी ॲक्ट) अंतर्गत चेन्नईच्या कार्यालयासोबत काम होणार आहे. केंद्र सरकारच्या बौद्धिक संपदा हक्क कायद्या अंतर्गत होणाऱ्या या नोंदणीसाठी चैन्नईच्या कार्यालयात जावे लागते. यासाठी या कार्यालयासोबत समन्वय साधत जीआयमधील क्लिष्टता कमी करण्यात येणार आहे.

पुढारी



पणनच्या निर्यात प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र प्रशिक्षिणार्थींना वाटप करताना डॉ. सुधीरकुमार गोयल. समवेत दीपक शिंदे व सुनील पवार.

# नवे कृषिमाल निर्यातदार तयार होणे अभिमानास्पद

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

■ माजी अपर मुख्य सचिव डॉ. सुधीरकुमार गोयल यांचे मत

'कृषिमाल निर्यात करीत असताना प्रशिक्षण हे महत्त्वपूर्ण आहे. त्यादृष्टीने हॉर्टिकल्चर एक्स्पोर्ट ट्रेनिंग कोर्सच्या माध्यमातून राज्यात नवे कृषी निर्यातदार तयार होत आहेत, ही अभिमानास्पद बाब आहे,' असे गौरवोद्गार कृषी व पणन विभागाचे माजी अपर मुख्य सचिव डॉ. सुधीरकुमार गोयल यांनी काढले.

राज्य कृषी पणन मंडळाच्या हॉर्टिकल्चर एक्स्पोर्ट ट्रेनिंग कोर्सच्या ५७ व्या तुकडीचे प्रमाणपत्र वाटप त्यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २०) झाले, त्या वेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पणन संचालक व पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, सरव्यवस्थापक दीपक शिंदे व अन्य मान्यवर या वेळी उपस्थित होते.

डॉ. गोयल म्हणाले, 'प्रशिक्षणार्थींनी प्रत्यक्ष कामकाज सुरू करताना शेतमाल निर्यातीत आयातदार शोधणे, कृषिमालासाठी बाजारपेठ मिळविणे, बाजारपेठांच्या बदलत्या मागण्यांवर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. पणन मंडळाच्या निर्यात प्रशिक्षणातून राज्यात नवनवीन कृषिमाल निर्यातदार तयार होत असल्याचे बघून समाधान वाटते. म्हणजेच, कृषिमाल निर्यात वाढण्याबरोबरच रोजगाराच्या संधीही उपलब्ध होत आहेत.' पणन संचालक सुनील पवार म्हणाले, 'कृषिमाल निर्यातीच्या पाच दिवसांच्या प्रशिक्षणातून अनेक यशस्वी निर्यातदार तयार झाले आहेत.

कोर्समध्ये १ हजार ३७५ प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण घेतले असून, ३०० पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थींनी कृषिमाल निर्यातीमध्ये व निर्यातीच्या पुरवठा साखळीत कामकाज सुरू केले आहे. प्रशिक्षणातून यशस्वी निर्यातदार तयार होणे, हीच खरी कामाची पावती आहे.

Pune Edition
May 23, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

दिव्य सिटी 21-05-2022



# महोत्सवाच्या उद्‌घाटनापूर्वीच ७०० किलो हापूस, केशर आंब्याची खरेदी

## जाधववाडी बाजार समितीत आंबा महोत्सवाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद; फलोत्पादनमंत्री संदिपान भुमरे यांच्या हस्ते प्रारंभ

प्रतिनिधी । औरंगाबाद

ग्राहकांना नैसर्गिकरीत्या पिकवलेले आंबे थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करता यावेत या उद्देशाने कृषी पणन मंडळ व बाजार समितीच्या वतीने आयोजित चारदिवसीय आंबा महोत्सवाला शुक्रवारपासून (२० मे) प्रारंभ झाला. सकाळी सात वाजेपासून शेतकऱ्यांनी स्टॉल्स लावले होते. सकाळी १० वाजता फलोत्पादनमंत्री संदिपान भुमरे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले, मात्र तोपर्यंत ग्राहकांनी ७०० किलो हापूस, केशर खरेदी करत पहिल्या दिवशी चांगला प्रतिसाद दिला.

जाधववाडी कृषी उत्पन्न बाजार समितीत २० ते २३ मेदरम्यान हा महोत्सव होत आहे. रत्नागिरी, दापोली, पैठण, दरकवाडी आदी ठिकाणच्या शेतकऱ्यांनी त्यात सहभाग घेतला आहे. पहिल्याच दिवशी २० स्टॉल लागले होते. २५० ते ३०० ग्रॅम वजनाचा हापूस सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. उद्‌घाटनप्रसंगी मंत्री भुमरे, जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, आमदार अंबादास दानवे, कैलास पाटील, डॉ. कल्याण काळे, जगन्नाथ काळे यांनी हापूसची चव चाखली. केशर काढणीला आला आहे. कच्चा व पिकलेला केशर आंबा उत्पादक गोवर्धन जगदाळे, ज्ञानदेव कचकुरे, रसूल शेख यांनी विक्रीसाठी आणला आहे. एकूण २०० किलो केशर महोत्सवात दाखल झाला असून त्यालाही ग्राहकांची चांगली पसंती मिळत आहे.

### २४५ पेट्या हापूस, ३५० किलो केशरची विक्री

शुक्रवारी दुपारनंतर ४०० क्विंटल आंबा दाखल झाला. ग्राहकांची मागणी चांगली असल्याने उत्पादकांना मोठा दिलासा मिळाला आहे. नैसर्गिकरीत्या पिकवलेला हापूस ५०० रुपये डझन व केशरला १५० रुपये डझन भाव मिळत आहे. सायंकाळी साडेसातपर्यंत १३ उत्पादकांची २४५ पेट्या (प्रत्येक पेटीत पाच ते सहा डझन) हापूस, चार उत्पादकांची ३५० किलो केशर आंब्याची विक्री झाली होती.



महोत्सवाच्या उद्‌घाटनाप्रसंगी मंत्री संदिपान भुमरे, आ. अंबादास दानवे, जिल्हाधिकारी चव्हाण.

### कोल्ड स्टोअरेजसाठी निधी देऊ : मंत्री भुमरे

भुमरे म्हणाले, पाचोडला २५ कोटी रुपये देऊन कोल्ड स्टोअरेजचे काम सुरू केले आहे. पैठण येथे ६२ एकरवर ४० कोटींचे मोसंबी क्लस्टर उभे राहत आहे. त्याला आणखी १२ कोटींची मान्यता देण्यात आली आहे. म्हणजे एकूण ५२ कोटींचे मोसंबी क्लस्टर गतिमान होईल. औरंगाबाद बाजार समितीत कोल्ड स्टोअरेज, नवीन बाजारपेठ सुरू केली जाईल.

### मी अंबादास, आंबा महोत्सव घेणार : अंबादास दानवे

माझ्या नावातच 'अंबा'दास आहे. त्यामुळे लवकरच शहराच्या मध्यभागी आंबा महोत्सव घेणार असल्याचे आ. अंबादास दानवे यांनी सांगितले. जिल्हा प्रशासनाच्या पुढाकाराने शहरात १२ ठिकाणी आंबा व मोसंबी विक्रीची केंद्रे सुरू करणार. जिल्ह्यात ६० मेट्रिक टन आंबा निर्यात क्षमता आहे. त्यानुसार निर्यातीला प्रोत्साहन दिले जाईल, असे जिल्हाधिकारी चव्हाण म्हणाले.

# जत्रेत दुसऱ्या दिवशीही ५ मेट्रिक टन आंबा विक्री

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृतज्ञता पर्व अंतर्गत शाहू मिल येथे सुरू असलेल्या आंबा जत्रेत दुसऱ्या दिवशी तब्बल ५ मेट्रिक टन आंबा विक्री झाली. यातून उत्पादकांना ४ लाख ८० हजार रुपये प्राप्त झाले. हा आंबा महोत्सव रविवार (दि.२२) पर्यंत सुरू राहणार आहे, अशी माहिती पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी दिली.

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त उत्पादक ते ग्राहक थेट विक्री अंतर्गत 'जत्रा आंब्याची' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. आंब्यांच्या जत्रेत देवगड हापूस, रत्नागिरी हापूस, पायरी, बिटक्या यासह केंट, कोकण सम्राट, रत्ना, बारमासी, दशेहरी, फरणांडीन, दुधपेढा, गोवा मानखूर, तोतापुरी, ऑस्टिन, लिली, नीलम व वनराज व किट हे शुगर फ्री प्रजातीचे आंबे विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. याठिकाणी १८ उत्पादकांचे १८ स्टॉल लावण्यात आले आहेत. पहिल्या दिवशी तब्बल ६ मेट्रिक टन आंब्यांची विक्री झाली असून यातून अंदाजे सव्वा ६ लाखांहून अधिक रकमेची उलाढाल झाली तर दुसऱ्या दिवशी ५ मेट्रिक टन आंबा विक्री होऊन त्यातून ४ लाख ८० हजारांची उलाढाल झाली. दोन दिवसांत सुमारे ११ टन आंबा विक्री झाली. आंबा खरेदीसाठी कोल्हापूरकरांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे, असेही डॉ. घुले यांनी सांगितले.

■ **रविवारीपर्यंत आंबा जत्रा सुरू राहणार : डॉ. सुभाष घुले**

Pudhari Dt. 21/05/2022

पुण्य नगरी

# बाजार समिती आवारात केशर, हापूसचा दरवळला सुगंध




औरंगाबाद : कृषी उत्पन्न बाजार समिती व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेअंतर्गत बाजार समितीच्या आवारात आंबा महोत्सव-२०२२ चे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, २० रोजी फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. आ. अंबादास दानवे, राकाँचे जिल्हाध्यक्ष कैलास पाटील, काँग्रेस कमेटी जिल्हाध्यक्ष डॉ. कल्याण काळे, मुख्य प्रशासक जगन्नाथ काळे, उपमुख्य प्रशासक पांडुरंग तांगडे, सचिव विजय शिरसाठ, जिल्हाधिकारी सुनील चव्हाण आदी उपस्थित होते.

बाजार समितीच्या वतीने दरवर्षी आंबा महोत्सव आयोजित करण्यात येतो. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून कोरोनामुळे हा महोत्सव घेता आला नव्हता. दरम्यान, यंदा कोरोना बंधने शिथिल झाल्यामुळे महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामुळे व्यापाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. याठिकाणी मराठवाड्यातील केशर पान/३



महोत्सवात आंब्यांची पाहणी करताना मंत्री संदिपान भुमरे, आ. अंबादास दानवे आदी.

## शहरात १२ ठिकाणी केशर आंबा विक्री स्टॉल

औरंगाबाद : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेतील 'विकेल ते पिकेल- उत्पादक ते ग्राहक' यावर आधारित शेतकऱ्यांना केशर आंबा विक्रीसाठी महापालिकेच्या हद्दीत १२ ठिकाणी विक्री स्टॉल उभारण्यास जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांनी मान्यता दिली आहे. शहरातील जालना रोडवरील विमानतळासमोर असलेल्या प्राईड फिनिक्स, माय वर्ल्ड, कासलीवाल मार्बल, पैठण रोडवरील साक्षी पॅराडाईज, शहानूरमियाँ दर्गा, दूध डेअरी परिसर, सेव्हन हिल, कॅनॉट पॅलेस, गजानन महाराज मंदिर, रेल्वे स्टेशन, टी. व्ही. सेंटर आणि विमानतळ येथे आंबा विक्रीचे स्टॉल्स वाहतूक शाखेच्या परवानगी घेतल्यानंतर रहदारी व वाहतुकीस अडथळा होणार नाही. या अटीच्या अधीन राहून जिल्हाधिकारी यांनी या स्टॉलला मान्यता दिली आहे.

**उत्पादक ते थेट ग्राहक योजना**

पुढारी

# शेतकऱ्यांनी आंबा निर्यातदार व्हावे

पुणे : पुढारी वृत्तसेवा

अधिकाधिक शेतकऱ्यांनी स्वतःच निर्यातीमध्ये उतरून आंबा निर्यातदार व्हावे, अशी अपेक्षा राज्याचे सहकार व पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनी व्यक्त केली.

सहकार व पणनमंत्री पाटील यांची अपेक्षा

वाशी येथे राज्य कृषी पणन मंडळाच्या सुविधा केंद्र आणि भाजीपाला प्रक्रिया सुविधेस त्यांनी नुकतीच भेट देऊन कामकाजाची पाहणी केली, त्या वेळी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील यांनी सहकारमंत्र्यांचे स्वागत केले.

अमेरिकेत आंब्याची निर्यात वाढविण्यासाठी कृषी पणन मंडळाचे प्रयत्न स्तुत्य असून, २०० मे. टन निर्यातीचा टप्पा पूर्ण करणे ही बाब राज्याच्या आंबा निर्यातदार शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, असे मत बाळासाहेब पाटील यांनी व्यक्त केले.

पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रावरून अमेरिकेस यंदाच्या हंगामात आत्तापर्यंत २०६ मेट्रिक टन, ऑस्ट्रेलियास एकूण २० मेट्रिक टन आंब्यांची निर्यात झाली. भाजीपाला प्रक्रिया सुविधेमधून अमेरिका, ऑस्ट्रेलियासाठी आतापर्यंत ८५ मेट्रिक टन आंब्यांवर प्रक्रिया करण्यात आली. तसेच युरोपमध्ये ५० मेट्रिक टन आणि इंग्लंडला २५० मेट्रिक टन आंब्यांची निर्यात झाल्याचे भास्कर पाटील यांनी कळविले आहे.

Pune Edition
May 15, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## विकिरण प्रक्रिया

### ...अशी केली जाते विकिरण प्रक्रिया

आलेला आंबा प्रथम ५२ अंश सेल्सिअस तापमानाच्या पाण्यामध्ये ३ मिनिटे ठेवला जातो. यानंतर त्याचे पॅकिंग केल्यानंतर विकिरण भट्टीमध्ये ५४ मिनिटे ठेवले जातात. या भट्टीतून आंबा पेट्या प्रवास करताना त्यावर ४०० ते १ हजार ग्रेड क्षमतेच्या गॅमा किरणांचा मारा केला जातो. ही मात्रा सरासरी ७५० ग्रेड एवढी असते. प्रक्रियेनंतर आंब्याचे बॉक्स पॅकिंग करून कंटेनरद्वारे निर्यातीसाठी सज्ज होतात.

### हंगामात झालेली निर्यात

| देश | टन |
|---|---|
| जपान | १२ |
| अमेरिका | १२५ |
| ऑस्ट्रेलिया | २० |
| इंग्लंड | १५० |
| युरोप | १०० |



विशिष्ट प्रकारच्या रॅकवर आंबा पेट्या ठेवून, त्या विकिरण यंत्रणेमध्ये पाठवल्या जातात. तिथे त्यावर गॅमा किरणांचा मारा केला जातो.



विकिरण यंत्रणेमध्ये पेट्यांवर एकूण ५३ मिनिटे गॅमा किरणांचा मारा केला जातो. पेट्यांचा प्रवास विकिरण यंत्रणेमध्ये कशा प्रकारे होतो, हे संगणकावर दाखवताना तज्ज्ञ.



निर्यातीसाठी पॅकिंगमध्ये सज्ज असलेला आंबा.

“ निर्यातीद्वारे शेतकऱ्यांना उत्तम नफा आणि देशाला परकीय चलन मिळते. राज्य कृषी पणन मंडळाद्वारे कृषी हवामान विभागासह उत्पादननिहाय विविध पिकांसाठी सुमारे ४४ निर्यात सुविधा केंद्रे उभारली आहेत. त्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने मोठी गुंतवणूक केली आहे. विविध देशांच्या निर्यातीसाठी आवश्यक निकष व मागणीनुसार काढणीपश्चात निर्यात सुविधा आणि विकिरणासारखे आधुनिक तंत्रज्ञान उभारले आहे. या सुविधेमुळे अमेरिका, जपान देशांमध्ये हापूस, केसरसह विविध आंब्याची निर्यात सुरू आहे. जागतिक पातळीवर आपला आंबा पोहोचत असून, मागणी वाढत आहे. दरवर्षी विविध प्रगतिशील देशांमध्ये आंबा निर्यात खुली करण्यासाठी पणन मंडळ प्रयत्नशील आहे.
- **सुनील पवार**, पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, आणि कार्यकारी संचालक, राज्य कृषी पणन मंडळ

- डॉ. भास्कर पाटील, ९४२३००४७९६, (उपसरव्यवस्थापक, कोकण विभाग, राज्य कृषी पणन मंडळ) - सतीश वराडे, ८५५१९५४१९८, (निर्यात विभाग, राज्य कृषी पणन मंडळ)

ॲग्रो मनी

# वाशीच्या सुविधा केंद्रातून ४०० टन आंबा निर्यात

» पान १० वरून

या तपासणीनंतर आणि एकूण निर्यातविषयक सुविधांबाबत शाश्वती निर्माण झाल्यामुळे पुढील वर्षीपासून अमेरिकन इन्स्पेक्टरशिवाय निर्यात होणार आहे. यामुळे दरवर्षी इन्स्पेक्टर येणे, राहणे आणि तपासण्यांवरील खर्च आणि विलंब टाळणे शक्य होईल. यासाठी पणन मंडळ आणि फलोत्पादन विभागाद्वारे हापूस आंबा उत्पादक किमान १५०, तर केसर आंबा उत्पादक किमान ५० मँगोनेट नोंदणीकृत शेतकरी निवडून निर्यातीच्या दृष्टिकोनातून प्रशिक्षण आणि कार्यशाळा आयोजित केली जाईल. यासाठी पणन मंडळ कृषी माल निर्यातीची नोडल एजन्सी म्हणून अपेडा, राष्ट्रीय पीक संरक्षक संघटना (एन.पी.पी.ओ.) व फलोत्पादन विभाग यांच्यासोबत समन्वयाने काम करत असल्याचे पणन मंडळाचे निर्यात विभाग प्रमुख सतिष वराडे यांनी सांगितले.

# वाशीच्या सुविधा केंद्रातून ४०० टन आंबा निर्यात

अर्थकथा
गणेश कोरे

**सध्या आंबा निर्यातीचा हंगाम सुरू आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या निर्यात सुविधा केंद्रावरून या वर्षी विविध जातींच्या सुमारे अडीच हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट आहे. या निर्यात सुविधा केंद्रातून आतापर्यंत सुमारे ४०० टन आंबा निर्यात झाला असून, सुमारे २०० कोटी रुपयांची उलाढाल झाली. त्याचा थोडक्यात आढावा...**

विविध पिकातील शेतकरी निर्यातक्षम शेतीकडे वळत आहेत. या उत्पादनांसाठी जागतिक बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाद्वारे विविध योजना, उपक्रम राबवले जात आहे. त्यासाठी आवश्यक सुविधा पुरवल्या जात आहे. विविध शेतीमालांच्या निर्यातीबरोबरच कोकणातील हापूस आणि मराठवाड्यातील केसर आंबा आपल्या अनोख्या चवीमुळे जागतिक बाजारपेठेत प्रसिद्ध होत आहे. भारतातून दरवर्षी सुमारे ५० हजार टनांपर्यंत आंब्याची निर्यात होते. यात हापूस, केसर, बैंगनपल्ली, दशहरी, चौसा इ. प्रमुख वाणांचा समावेश आहे. महाराष्ट्रामध्ये समुद्र आणि हवाई मार्गे निर्यातीसाठीच्या सुविधा उपलब्ध आहेत. विविध देशांसाठी आंबा निर्यात करण्यापूर्वी काढणीपश्चात आवश्यक प्रक्रिया व सुविधा केंद्रांची उपलब्धता राज्यात आहे. त्यामुळे इंग्लंड, युरोपातील देश, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, न्यूझीलंड, दक्षिण कोरिया अशा आर्थिकदृष्ट्या संपन्न देशात निर्यातीचा आलेख उंचावत आहे. शेतमाल निर्यातीसाठी राज्यात कृषी पणन मंडळाने कृषी हवामान विभागनिहाय विविध ठिकाणी ४४ निर्यात सुविधा केंद्रे उभारली आहेत. त्यातील ९ सुविधा केंद्राचा वापर आंबा निर्यातीसाठी होतो. विविध देशांच्या निर्यातीच्या निकषानुसार विविध प्रक्रियांसाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि यंत्रणा उभारल्या आहेत.

## निर्यातीसाठीचे नियोजन आणि प्रयत्न

आंबा निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी उत्पादक, खरेदीदार आणि विक्रेत्यांच्या बैठका, मेळाव्याचे आयोजन केले जाते. २०२२ या वर्षी निर्यात हंगामात पणन मंडळ, कृषी विभाग व अपेडा यांच्या संयुक्त सहकार्याने रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड या जिल्ह्यांमध्ये कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यात आंब्याची काढणी, हाताळणी, प्रतवारी, निर्यात प्रक्रिया, सुविधा वापर, साका विकृती समस्या दूर करण्यासाठी अर्क साका निवारकाचा वापर, निर्यातीसाठी आवश्यक परवाने यांची माहिती दिली.

## जपान, दक्षिण कोरियासह न्यूझीलंड बाजारपेठ खुणावतेय

या वर्षी दक्षिण कोरिया आणि जपानच्या निर्यातीला नुकतीच परवानगी मिळाली असून, न्यूझीलंडही बाजारपेठही लवकरच खुली होण्याची शक्यता असल्याची माहिती कोकण विभागाचे उपसरव्यवस्थापक भास्कर पाटील यांनी सांगितले. या हंगामात जपान आणि दक्षिण कोरियासाठी प्रत्येकी ५० टन असे १०० टन आणि युरोपियन व अन्य देशांसाठी २०० टन आंबा प्रक्रिया आणि निर्यातीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विकिरण सुविधा केंद्रावरून या वर्षी अमेरिका ६०० टन, ऑस्ट्रेलिया २०० टन आंबा प्रकियेचे उद्दिष्ट ठेवले असल्याचेही डॉ. पाटील सांगतात.

## ...अशी होते आंब्याची तपासणी

अमेरिकेसाठी होणाऱ्या आंब्याची विविध टप्प्यांवर तपासणी केली जाते. या बाबत सांगताना अमेरिकेच्या निर्यात इन्स्पेक्टर आणि वनस्पती रोगशास्त्र तज्ज्ञ कॅथरिन फिडलर म्हणाल्या, "शेतकरी आणि निर्यातदारांनी निर्यातीसाठी पाठविलेल्या प्रत्येक १०० बॉक्सच्या मधील ३ बॉक्स तपासणीसाठी घेतले जातात. त्यातील प्रत्येक आंबा व त्याची कोयही कापली जाते. त्यात फळमाशी, कोयकीड यांच्या अस्तित्वाची तपासणी केली जाते. आंब्यामध्ये काही डाग आढळल्यास, त्याचीही सूक्ष्मदर्शकाखाली काटेकोर तपासणी केली जाते. या वर्षीच्या निर्यातीमधील एकाही लॉटमध्ये आतापर्यंत फळमाशी आणि कोयकीड आढळलेली नाही."

## निर्यात होईल अधिक वेगवान...

गेल्या दोन वर्षांत कोरोना महामारीमुळे अमेरिकन तपासनीस (इन्स्पेक्टर) भारतात येऊ शकले नाही. परिणामी, आंबा निर्यात झाली नव्हती. या वर्षी महिला इन्स्पेक्टर कॅथरिन फिडलर भारतात आल्या असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली निर्यात सुरू आहे. ही निर्यात प्रक्रिया ७ एप्रिलपासून सुरू झाली असून, १८ जूनपर्यंत चालेल. या दरम्यान या इन्स्पेक्टर पुढील वर्षीच्या निर्यातीसाठी मँगोनेटअंतर्गत नोंदणीकृत हापूस व केसर आंबा बागांची तपासणी करतील. तसेच पॅकहाउस व विकिरण सुविधा केंद्राचे लेखापरीक्षणही (ऑडिट) करतील. यात किमान २०० नोंदणीकृत शेतकरी निवडून त्यांच्या बागांच्या मागील ३ वर्षांच्या रेकॉर्डचीही तपासणी केली जाईल.

पान १४ वर »

### उष्णजल प्रक्रिया



उष्णजल प्रक्रियेसाठी टनेलमध्ये आंबे सोडत असताना कामगार.



आंबा ५२ अंश सेल्सिअस उष्ण पाण्यामध्ये ३ मिनिटे ठेवला जातो.



वाशी येथील आंबा निर्यात सुविधा केंद्र आणि विकिरण विभाग

### देशनिहाय प्रक्रिया निकष

- अमेरिका, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, निर्यातीसाठी विकिरण प्रक्रिया करण्यापूर्वी ५२ अंश सेल्सिअस तापमान असलेल्या पाण्यामध्ये आंबे ३ मिनिटे ठेवून उष्णजल प्रक्रिया केली जाते.
- दक्षिण कोरियाला निर्यातीसाठीही वरील प्रकारे उष्णजल प्रक्रिया केल्यानंतर पुन्हा बाष्पांच्या साह्याने (व्हेपर हीट) उष्णता दिली जाते. या सुविधेची क्षमता दीड टन प्रति तास इतकी आहे.
- युरोप, दक्षिण कोरिया, रशिया, मॉरीशियस, चीन या देशांना आंबा निर्यात करण्यापूर्वी आंबे ४८ अंश सेल्सिअस तापमान असलेल्या पाण्यात ६० मिनिटे ठेवून प्रक्रिया केली जाते.

### अमेरिकन इन्स्पेक्टरद्वारे तपासणीची प्रक्रिया



निर्यातीसाठी आलेल्या १०० पेट्यांतून कोणत्याही तीन पेट्या तपासणीसाठी काढल्या जातात.



या बॉक्समधील प्रत्येक आंबा कापून गर तपासला जातो. डाग, साका आढळल्यास त्याची तपासणी सूक्ष्मदर्शकाखाली करतात.



अगदी प्रत्येक कोयही फोडून, त्यात कीड-रोगाचे अंश सूक्ष्मदर्शकाखाली तपासले जातात.

पुढारी

# तब्बल ४० कोटींचा आंबा सातासमुद्रापार!

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**राज्य कृषी पणन मंडळाच्या निर्यात सुविधा केंद्रांच्या वापरातून सद्य:स्थितीत निर्यातदारांकडून विविध देशांना आतापर्यंत सुमारे २५० मेट्रिक टनाइतका आणि सुमारे ४० कोटी रुपये किमतीची आंबा निर्यात पूर्ण झालेली आहे. त्यामध्ये इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, अमेरिका तसेच युरोपमधील काही देश आणि आखाती देशांचा समावेश आहे.**

पणनच्या निर्यात सुविधांच्या वापरातून चालूवर्षी राज्यांतून सुमारे अडीच हजार मे. टनाइतक्या आणि सुमारे १७५ कोटी रुपये किमतीच्या आंब्यांची एकूण निर्यात हंगामअखेरीस होण्याची अपेक्षा आहे. तसेच कोविडनंतर पुन्हा अमेरिकेस आंबा निर्यात सुरू झाली असून, तेथील कृषी विभागाच्या निरीक्षकांच्या देखरेखीखाली वाशीहून आंबा निर्यातीस आता वेग आला आहे. तसेच, कोविडनंतर आता दक्षिण कोरियाकडूनही आंबा आयातीस हिरवा कंदील मिळाला आहे.



देशातून सुमारे ५० हजार मेट्रिक टनाइतकी आंबा निर्यात दरवर्षी होत असून, त्यामध्ये महाराष्ट्राचा सर्वाधिक वाटा आहे. महाराष्ट्रातील हापूस, केशर, कर्नाटकातील बैंगनपल्ली तर दिल्लीचा दशहरी, चौसा या जातीच्या आंब्यांची निर्यात प्रामुख्याने होते. हवाई वाहतूक आणि समुद्रमार्गे आंबा निर्यातीस प्राधान्य दिले जात असून, विविध देशांच्या गरजेनुसार तेथील आयातीचे नियम व अटींची पूर्तता करण्यासाठी आंब्यांवर आवश्यक प्रक्रिया केली जाते. त्यामध्ये पणन मंडळाच्या ४४ पैकी ९ आंबा निर्यात सुविधा केंद्राचा वापर आंबा निर्यातदार करतात. ज्यामध्ये आंब्यांची प्रत चांगली असणे, फळावर डाग नसणे, ओरखडे नसणे हे तपासले जात असल्याची माहिती मंडळाचे उप सरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील आणि निर्यात व्यवस्थापक सतीश वराडे यांनी वाशी येथे पत्रकारांना दिली.

"आंब्यांच्या निर्यातीच्या प्रत्येक लॉटमधील वेगवेगळ्या बॉक्समधून ३० आंबे तपासण्यास घेतले जातात. ज्यामध्ये कोयकिडा, फळमाशी आदींची तपासणी केली जाते. ज्यामध्ये हे दोन्ही घटक नाहीत, अशा आंब्यांच्या निर्यातीस आवश्यक प्रक्रिया करून परवानगी देण्याचे काम आम्ही पणन मंडळाच्या वाशी निर्यात सुविधा केंद्रांतून करीत आहोत. भारतात शेतमाल निर्यातीच्या सुविधा चांगल्या प्रकारे उपलब्ध करून दिल्या गेल्या आहेत. त्यामुळे भारत आणि अमेरिकेच्या संयुक्त सहकार्यातून कोविडनंतर आंबा निर्यात पूर्ववत सुरू झाली आहे. आतापर्यंत अमेरिकेला १०० मेट्रिक टन आंबा निर्यात पूर्ण झाली आहे.

**कॅथरिन फिडलर,** वनस्पती रोगशास्त्रज्ज्ञ निरीक्षक, कृषी विभाग, अमेरिका.

"महाराष्ट्रासह देशातील अन्य राज्यांकडूनही तेथील आंबा निर्यातीस सुरुवात झाली आहे. पणन मंडळांकडून उभारण्यात आलेल्या निर्यात सुविधा आंध्र प्रदेशातही उभारण्यात आल्या आहेत. जागतिक बाजारपेठ, देशांतर्गत बाजारपेठेतील महाराष्ट्राचे अग्रस्थान कायम ठेवण्यासाठी निर्यातदार आणि आंबा बागायतदारांनाही आंब्यांचा दर्जा व किफायतशीर दरावर लक्ष केंद्रित करावे लागेल. बदलत्या हवामानाचेही आव्हान असून ते पेलून राज्याला आपली आघाडी कायम ठेवावी लागेल. पणन मंडळाच्या निर्यात सुविधांमुळे आंबा निर्यातीस गती आलेली आहे.

**सुनील पवार,** कार्यकारी संचालक, राज्य कृषी पणन मंडळ

Pune Gramin Edition
May 1, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in